MHNS140017412025

**नियमित दिवाणी दावा क्रं.३२२/२०२५ मधील नि.क्र. ०५ वरील आदेश**
**श्री. जगन भवर व इतर वि. श्री. बाजीराव निमसे व इतर**

वादीने प्रस्तुत अर्जान्वये प्रतिवादींविरुध्द अंतरिम एकतर्फा मनाई हुकूम प्रतिवादी क्र १ यांच्याविरुध्द मागणी केली आहे.

२. अर्जाचे अवलोकन केले. तसेच वादीच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. त्यांचे असे कथन आहे की, दावा मिळकत ही मुळ मालक गंगाराम महादु भवर, शंकर बारकु भवर, दामु शंकर भवर , भिका नथु भवर, त्र्यंबक काशिनाथ भवर, काबु नथु भवर, मुरलीधर काशिनाथ भवर, सखाराम गणपत भवर व इतर यांचे मालकी हक्काची व कब्जेवहिवाटीतील होती. वादी हे सखाराम गणपत भवर यांचे वारस होते व आहे. दावा मिळकतीतील सहधारक बाजीराव त्रंबक भवर यांच्याकडून प्रतिवादी क्र १ यांनी ०० हे. १३ आर इतके क्षेत्र दि.११/१२/२०२४ रोजी फरोक्त खरेदीखताचा दस्त क्र. ५४१९/२०२४ अन्वये खरेदी घेतले आहे. सदर खरेदीखतामध्ये मिळकती बाबतच्या मोघम चतुःसिमाचे अनभिज्ञ असलेल्या क्षेत्राचा ताबा मिळविण्यासाठी प्रतिवादी क्र १ ने तालुका निरीक्षक भुमिअभिलेख दिंडोरी यांच्याकडू मो. रं नं.०२७५८० अन्वये पोट हिस्सा मोजणी करण्याकरीता अर्ज केला आहे. परंतु वादी यांची नावे ही तहसिलदार दिंडोरी ता. दिंडोरी यांच्याकडील क्र. अधि/अभि/दुरुस्ती/८४५/२०२४ मधील दि.०८/०८/२०२५ रोजीच्या आदेशान्वये क्षेत्र ००हे. ८० आर ऐवजी वादीचे नाव केवळ ०० हे. ३१ आर इतक्यास क्षेत्रात फेरफार नोंद क्र ११७३ अन्वये दाखल झालेली होती व आहे. आजरोजी वादीच्या ताब्यात वडिलोपार्जित क्षेत्र ०० हे. ८० आर असून सदर

परिस्थिती प्रतिवादी क्र १ यांनी केलेल्या अर्जाने वादी यांचे क्षेत्र ०० हे. ३१ आर असे सामाईक क्षेत्र दाखविण्यात येईल व त्या अनुषंगाने प्रतिवादी क्र १ वादींच्या क्षेत्राचा कब्जा घेण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे दावा मिळकतींच्या मालकी हक्कामध्ये गुंतागुंत निर्माण होवून  कब्जा बाबत मोठा वाद निर्माण होवू शकतो. म्हणून वादीने प्रतिवादी क्र १ यांच्या विरुध्द सदर प्रतिवादी  प्रस्तुत दाव्यात हजर होवून प्रस्तुत अर्जास जबाब दाखल करेपर्यंत त्याच्याविरुध्द एकतर्फा अंतरिम मनाई हुकूम देण्याची मागणी करत आहे.

**३.** न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत दावा, हा वादींनी ठरावासाठी तसेच निरंतर ताकिदीच्या हुकूमासाठी दाखल केला आहे.  दावा मिळकतीच्या सातबारा उता–याचे अवलोकन केल असता सन२०२१–२२ ते सन २०२३ –२४ तसेच सन २०२४ –२५ च्या सातबारा सदरी वादींचे नावे सामाईक क्षेत्र ००हे. ८० आर दिसून येते. परंतु सदरचे क्षेत्र सन २०२५–२६ च्या सातबारा उतारा  ३१ आर दिसून येते आणि त्यात इतर सह हिस्सेदार समाविष्ट झाल्याचे दिसून येते. सदर ३१ आर क्षेत्र हे फेरफार नोंद क्र. ११७३ ने दिसून येते. सदरची नोंद दि.०१/१०/२०२५ रोजी मंजूर झालेली दिसून आली. सदर फेरफार वादीने उपविभागीय अधिकारी दिंडोरी यांच्याकडे आव्हानित केलेली दिसत आहे. तसेच प्रतिवादी क्र १ च्या अर्जानुसार पोटहिस्सा मागणीची नोटीस वादी व इतर सह हिस्सेदार यांना मिळालेली दिसते. सदर नोटीसीनुसार पोट हिस्सा मोजणी ही दि.१८/११/२०२५ रोजी असल्याचे दिसून येते. त्यासाठी देखिल वादीने हरकत घेतल्याचे दिसून येत आहे. सबब, सर्व दावा मिळकतीबाबत सर्व दस्त ऐवजांचे अवलोकन केले असता, वादींचे सामाईक क्षेत्र ८० आर वरुन ३१ आर कसे झाले याबाबत संदिग्धता निर्माण होत आहे.  सबब, सदर पोट हिस्सांची मोजणी झाल्यास वादींच्या कब्जातील क्षेत्रास त्यांना मुकावे लागेल असे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. सबब, या ठिकाणी प्रतिवादी क्र. १ यांच्या विरुध्द एकतर्फा तुर्तातुर्त मनाई हुकूम ते प्रस्तुत दाव्यात हजर होवून जबाब दाखल करेपर्यंत दिल्यास तुलनात्मक दृष्टया त्यांचे होणारे नुकसान हे कमी आहे.

**४.** प्रस्तुत दाव्याचे व दावा मिळकतीचे स्वरुप पाहता सबब, वादीची अंतरिम एकतर्फा मनाई हुकूमाची मागणी मंजूर करणे न्यायोचित ठरणार आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. प्रतिवादी क्र १ यांच्याविरुध्द अंतरिम एकतर्फा मनाई हुकूम पारीत करण्यात येतो की, त्यांनी प्रस्तुत दाव्यात हजर होवून प्रस्तुत अर्जास जबाब दाखल करेपर्यंत तालुका निरीक्षक भुमिअभिलेख दिंडोरी यांच्याकडील मो.रं.नं. ०२७५८० अन्वये दावा मिळकती बाबतचा कोणताही पोट हिस्सा मोजणी करु नये.

२. वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिताच्या आदेश ३९ नियम ३ प्रमाणे पुर्तता करावी.

३. प्रतिवादी क्र १ला नोटीस काढुन दि.१०/१२/२०२५ पर्यंत त्यांचे म्हणणे प्रस्तुत अर्जास दाखल करावे की, त्यांच्याविरुध्द एकतर्फा मनाई हुकूम का कायम करण्यात येवु नये.

४. आवश्यकता भासल्यास प्रस्तुत नोटीसची बजावणी आपत्कालीन व विशेष बेलिफमार्फत करण्यात यावी.

PANDIT ASHWINI ANIL

Digitally signed by PANDIT ASHWINI ANIL
Date: 2025.11.18 12:44:24 +0530

दि. १८/११/२०२५ (ए.ए.पंडीत)
दिंडोरी. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दिंडोरी.